# विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन यांचे कार्यालय,अमरावती.कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२

दूरध्वनी ०७२१-२६६१७७५/फॅक्स ०७२१-२६६२७८२

***Divisional Commissioner Office, Amravati.***

ईमेल : amravati divcom@rediffmail.com वेबसाईट **http://amravatidivision.gov.in**


क्र.प्रासंनप्र/अम/निरि-१/कावि-318 /२०१८ दि. 05.02.2018

**संदर्भ** : आयुक्त तथा संचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी,मुंबई यांचे ईमेल पत्र क्र.नपप्रसं/रा.स्त.संवर्ग सरळसेवा भरती/प्र.क्र..../२०१८/कक्ष-६,दि.२३.१.२०१८.

**आ दे श.**

-ooo-

अमरावती विभागातील नगरपरिषदांमधील नगरपरिषद कर्मचारी/राज्यस्तरीय संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत या कार्यालयाकडून सहा संवर्गातील एकूण ४७ रिक्त पदांसाठी दि.६.८.२०१६ अन्वये, जाहिरात प्रसिध्द करुन सरळसेवा पदभरतीची कार्यवाही सुरु करण्यात आली होती.

तथापी,नगरविकास विभागाच्या दि.७.३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार, राज्यस्तरीय संवर्गासाठी आयुक्त तथा संचालक यांना नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने आयुक्त तथा संचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे संदर्भांकित पत्र प्राप्त झाले असून, सदरची पदे भरण्याची कार्यवाही नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून होणे आवश्यक असल्याने, नगरपरिषद संचालनालयाकडून सदर पदभरतीची कार्यवाही सुरु करण्यात आली असल्याचे कळविले आहे. त्यामुळे या कार्यालयाचे स्तरावरुन पदभरतीची कार्यवाही न करता सदरची पदभरती रद्द करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्यानुसार, या कार्यालयाकडून दि.६..८.२०१६ रोजी नगरपरिषद राज्य संवर्ग (श्रेणी-ब) मधील कर्मचा-यांची सहाही संवर्गातील देण्यात आलेल्या जाहिरातीव्दारे, सरळसेवा पदभरतीची कार्यवाही याव्दारे रद्द करण्यात येत आहे.

त्यानुषंगाने, या कार्यालयाकडून दि.६.८.२०१६ रोजीचे जाहिरातीनुसार राज्यातील ज्या-ज्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतेवळी परिक्षा शुल्क रु.३००/-व रु.१५०/- प्रमाणे रक्कम पदभरती समितीचे खात्यात ऑनलाईन चालानव्दारे जमा केली असेल, अशा उमेदवारांनी त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक, बँक खाते क्रमांक, बँकेचा आयएफएससी संकेतांक इत्यादी माहिती या कार्यालयाकडून नव्याने निर्माण केलेल्या ईमेल-आयडी क्रमांक (rdmaamravati.recruitmnet@gmail.com) या पत्यावर देण्यात यावी, जेणे करुन खर्च वजा जाता त्यांना परिक्षा शुल्काची रक्कम त्यांचे बँकेच्या खात्यात वळती करण्यात येईल.

त्याचप्रमाणे, या कार्यालयाकडून दि.६.८.२०१६ रोजीचे जाहिरातीनुसार राज्यातील ज्या-ज्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरले असतील, आता त्यांनी नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचेकडून सदर राज्यस्तरीय पदभरतीसाठी देण्यात येणा-या जाहिरातीचे वेळी इच्छुक असल्यास नव्याने अर्ज सादर करावेत. जेणे करुन त्यांना नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून घेण्यात येणा-या पदभरतीस सामोरे जाण्याची संधी प्राप्त होईल.

स्वाक्षरी

**(पियूष सिंह)**
**विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक**
**नगरपालिका प्रशासन,अमरावती**

प्रतिलिपी :

१) आयुक्त तथा संचालक,नगरपरिषद प्रशासन,संचालनालय,वरळी,मुंबई-०३०.
२) जिल्हाधिकारी,अमरावती/अकोला/यवतमाळ/बुलडाणा/वाशिम.
३) श्री आनंद काळे,संचालक, मे.एक्झॉन ऑटोमेशन लिमिटेड,दादर मुंबई.या कार्यालयाकडून घेण्यात येणारी संवर्ग कर्मचा-यांचे सरळसेवा भरतीची कार्यवाही रद्द करण्यात येत असल्याचे आदेश संगणक एजन्सीचे संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.त्याचप्रमाणे त्यावेळी ऑनलाईन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांचे भ्रमणध्वनी क्रमांक.आपले दप्तरी दाखल असल्यामुळे,एसएमएस व्दारे सुध्दा वरिल आदेशाची प्रत पाठविण्यात यावी.

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक